# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२४**

**सन २०२४-२५ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**बुधवार, दिनांक १० जुलै, २०२४**

## सार्वजनिक बांधकाम विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ५**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४,मार्ग व पुल**<br>**बाब क्रमांक: ८३, रूपये:- ५,००,००,००,०००/-**<br>**श्री. राजेश एकडे** |
| (१) | ६५६२ | १० | नांदुरा तालुक्यामध्ये चांदुर बिस्वा गावाजवळुन वाहणारी विश्वगंगा नदी आहे नदीच्या पलीकडुन मुस्लीम कब्रस्थान आहे, नदी ओलांडुन कब्रस्थान मध्ये जातांना मुस्लीम बांधवांना मोठी कसरत करुन जावे लागते त्यामुळे या नदीवर पुलांचे बांधकाम होणे फार गरजेचे आहे त्यामुळे चांदुरबिस्वा येथील विश्वगंगा नदीवर पुलाचे बांधकाम करणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (२) | ६५३८ | १० | तिवसा मतदारसंघात अमरावती, तिवसा, मोर्शी, भातकुली या चारही तालुके ग्रामीण क्षेत्राशी संबंधीत असून पुर्णपणे ग्रामीण क्षेत्र आहे. ही चारही तालुके नागपूर, वर्धा, अकोला, यवतमाळ या जिल्ह्यांना जोडलेली आहे. करीता मतदारसंघातील नागरिकांच्या व शेतीच्या वाहतुकीच्या दृष्टीने राज्यमार्ग, ग्रामीण मार्ग चे रुंदीकरण, सुधारणा करणे, डांबरीकरण, पुलाचे बांधकाम, राष्ट्रीय महामार्गांना जोडणारी रस्ते इ. कामाकरिता निधीची मोठ्या प्रमाणात आवश्यकता आहे. करीता मा. मंत्री सार्वजनिक बांधकाम, यांना दि. १९/०६/२०२४ रोजी चे लेखी निवेदन दिले आहे. तरी ग्रामीण मार्गाची सुधारणा करणे करीता रु. ४३.७० कोटी व राज्य मार्ग व जिल्हा मार्ग करीता रु. ३४०.०२ कोटी निधी मंजूर आहे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (३) | ६५५३ | १० | सिंदखेड राजा ते असोला जहागीर (ता.सिंदखेड राजा, जि.बुलढाणा) या मार्गाने सिंदखेड राजा येथून साधारणत: तीन किलोमीटर अंतरावर नदीपर्यंतचा रस्ता अत्यंत नादुरूस्त असणे, या रस्त्याचा काही भाग वन विभागाच्या अखत्यारित येत असल्यामुळे डांबरीकरण करण्यास अडचण येत असणे, त्यामुळे प्रवाशांना खड्यांचे दिव्य पार करून प्रवास करावा लागणे, सिंदखेड राजा व जवळपासच्या अनेक गावांतील लोकांना दररोज कामानिमित्ताने देऊळगाव मही, चिखली, बुलडाणा व शेगांव येथे जावे लागत असणे, येथे जाण्यासाठी सिंदखेड राजा-असोला जहागीर हा मार्ग शॉर्टकट असणे, हा मार्ग सिंदखेड राजा येथून असोला जहागीर व पुढे देऊळगाव राजा चिखली राष्ट्रीय महामार्ग क्र.एन.एच.४५३ ए. ला जोडत असल्याने |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | येथे येण्यास अत्यंत कमी वेळ लागत असणे, या गावांना देऊळगाव राजा येथून जायचे असल्यास साधारणत: २० ते २५ किलोमीटर जास्त अंतर लागत असणे, त्यामुळे प्रवासी सिंदखेड राजा हून देऊळगाव राजाला न जाता सिंदखेड राजा ते असोला जहागीर मार्गे एच.एच. ४५३ ला येऊन पुढील ठिकाणी जात असणे, हा मार्ग शॉर्ट कट असून वेळेची व इंधनाची बचत होत असणे, त्यामुळे या मार्गावरील वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढणे, परंतु रस्ता वन विभागाच्या प्रक्रियेत अडकणे, त्यामुळे हा रस्ता डांबरिकरणाने पूर्ण करण्यासाठी तातडीने वन विभागाची एनओसी घेऊन याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४) | ६५६१ | १० | कल्याण तालुक्यातील टिटवाळा गोवेली फाट्यावरील अनखरपाडा येथील सृष्टी रिसोर्टपर्यंतचा रस्ता अत्यंत जीर्ण आणि मातीचा झाला असल्याने पावसाळ्यात स्थानिक आणि पर्यटक यांना अडचणीचा सामना करावा लागणे, या रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत रिसॉर्ट मालकांनी सार्वजनिक बांधकाम विभागांकडे लेखी निवेदनाव्दारे मागणी करण्यात येणे, या रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत ग्रामपंचायतीने वांरवांर शासनाकडे दुरुस्तीबाबत मागणी करुनही अद्यापही दुरुस्ती न होणे, सदरहू रस्ता होणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विक्रमसिंह सावंत** |
| (५) | ६५५४ | १० | सांगली जिल्हयातील जत तालुका भौगोलिकदृष्टया सर्वात मोठा दुष्काळी तालुका असून तालुक्यातील रस्त्यांची लांबी मोठया प्रमाणात आहे. तालुक्यातील इतर जिल्हा मार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग अजून मुदमी व खडीचेच आहेत. तसेच बहुतांश राज्य मार्ग हे एक पदरी आहेत. किमान राज्य मार्ग नामांकनानुसार दीड ते दोन पदरी होणे आहे. तसेच बहुतांश राज्य मार्ग हे कर्नाटक राज्याला जोडलेले आहेत. त्यामुळे राज्य मार्गाचे रुंदीकरण होणे आवश्यक आहे. त्यासाठी दुष्काळी व भौगोलिक दृष्टया मोठया असणाऱ्या तालुक्याला जास्तीत जास्त निधीची तरतूद करणे तसेच याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १० जुलै, २०२४**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सार्वजनिक बांधकाम विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.